Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Issue – II March – April 2022

# भारतातील महिलांच्या विरुद्ध गुन्हेगारी प्रवृत्तीने होणारे अन्याय

**संशोधिका**
**साळवे उज्ज्वला भगवानराव**
शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. बी. एस. वडमारे**
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,
जालना.

**प्रस्तावना :**

दररोजचे वर्तमानपत्र उघडले म्हणजे आपले लक्ष अनेक समस्यांकडे वेधले जाते. त्यात कौटुंबिक हिंसाचार, खुन, आत्महत्या, मानसिक, शारिरीक, शाब्दिक, आर्थिक, लैंगिक असे छळ व स्त्री-भ्रुणहत्या, बलात्कार या सारख्या समस्यांची संख्या सतत वाढत असे जाणवते. महिलांची समस्या फक्त वर्तमानकालीन समाजातच आहेत काय? याचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा ह्या समस्या प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे लक्षात येते. मागील शतकात लोकहितवादी, दयानंद सरस्वती, राजाराम मोहनरॉय, आगरकर, म. ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निबंध, पुस्तके वाचली म्हणजे तेव्हाच्या समस्या व आजच्या समस्यांचे गांभीर्य लक्षात येते.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**उद्देश :**

१) महिलांवर होणाऱ्या अत्याचारा संदर्भात माहिती घेणे.

२) महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराबाबत माहिती घेणे.

३) महिलांवरील आर्थिक, शारिरीक, मानसिक गुन्ह्यासंदर्भात माहिती घेणे.

४) महिलांच्या गुन्हेगारीविषयक कायद्याची माहिती घेणे.

५) महिलांवर होणारे अत्याचार कमी होण्यासाठी उपाययोजना करणे.

**संशोधन व त्याचे स्वरूप :**

शारिरीक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: जिला अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा त्रास देणे, मारहाण करून दुखापत करणे, जिवे मारणे किंवा आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे.[१]

**आर्थिक छळाचे अन्याय :**

आर्थिक छळ करणे म्हणजे महिलेचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासुन तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे, खाण्यावर आणि कपड्यावर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवणे किंवा खर्च करू न देणे.

**शारिरीक छळाचे अन्याय :**

शारिरीक छळास मारहाण, तोंडात मारणे, तडाखा देणे, चावणे, लाथ मारणे, गुद्दे मारणे, ढकलणे, लोटणे (जोराचा धक्का मारणे) इतर कोणत्याही पद्धतीने शारिरीक दुखापत किंवा वेदना देणे. जाळणे, चटके देणे, बांधुन ठेवणे, औषधे किंवा जेवन न देणे.

**लैंगिक छळाचे अन्याय :**

जबरदस्तीचा किंवा नको असतांना घडवून आणलेला लैंगिक, गुप्तरोग किंवा अवेळी गरोदरपणापासून बचावासाठी निरोधाचा वापर करण्यास नकार देणे. जबरदस्तीने अश्लिल साहित्य बघण्यास किंवा त्यात सहभाग घेण्यास भाग पाडणे. शरीर विक्री करण्यास जबरदस्ती करणे.

**शाब्दिक छळाचे अन्याय :**

अर्वाच्च शिव्या देणे, धमक्या देणे, नावं ठेवणे, अपमान करणे, ओरडणे, दोष देणे, अश्लिल भाषेत बोलणे.

**मानसिक / भावनिक छळाचे अन्याय :**

स्त्रीच्या स्वाभिमानाला धक्का पोहचेल किंवा स्त्रीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मुद्दाम मानसिक धक्का पोहोचेल अशा वर्तुणुकीचा समावेश यात होतो. जसे अपमान करणे, वाईट बोलणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमान करणे. महिलेला विवाह करावयाचा नसल्यास जबरदस्तीने करणे, आत्महत्येची धमकी देणे, इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे यांचा समावेश होतो.

**स्त्रियांची छेडखानसारखे अन्याय :**

स्त्रियांची छेडखानी हा शहर महानगराशी निगडीत प्रश्न आहे. विभिन्न प्रदेशातील लोक एकत्र येतात व असे परस्परांना न ओळखणारे युवक गैरवर्तन करून व चित्रपट टी.व्ही. इ. परिणामामुळे तसेच एकट्या युवती बघून इंटरनेटचा दुरुपयोग करून मुलीची छेडखानी करतात. स्त्रियांची छेडखानी तिच्या इच्छेविरूद्ध असते. साधारणतः एकटीदुकटी स्त्री छेडखानीला बळी पडते. रस्ते, चौरस्ते, सिनेमागृहे व तत्स ठिकाणी अशी छेडखानी केले जाते.

**बालविवाह सारखे अन्याय :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने हिंदू विवाह कायद्यान्वये (१९५५) मुलीचे विवाह वय १५ आणि मुलाचे विवाह वय १८ वर्षे केले. त्यापुढे या कायद्यात १९७८ मध्ये दुरुस्ती करून आज मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ वर्षाचे ठरविण्यात आले तरीही अजुनही शहरी भागात व त्यापेक्षाही ग्रामीण भागात जास्त प्रमाण हे बालविवाहाचे आहे. हा अत्याचार मात्र स्वतःचे आई वडीलच आपल्या मुलीवर करतात.[२]

**स्त्री भ्रुण हत्यासारखे अन्याय :**

स्त्री जन्म दुःखाचे आगार बनला. स्त्री बालिका हत्येचे समर्थन करणाऱ्या धर्मसंस्कृती तत्त्वज्ञानाने विज्ञानाच्या साहाय्याने प्रसुतीपूर्व गर्भजल परिक्षण, लिंग चाचणी व स्त्री भ्रुण हत्या प्रथेला जन्मास घातले. मुलीच्या लग्नास हुंडा लागतो व मुलीच्या गैरवर्तनाने आपली इज्जत जाते. तसेच मुलगी नाक घालवते, कुणीतरी तिच्यावर बलात्कार करून फेकले. या भीतीने आई-वडील गर्भाशयातच तिला मारून टाकतात.[३]

**बलात्कार स्वरुपाचे अन्याय :**

निर्भया, शक्ती मिल, कोपर्डी हे सध्याच्या काळातील गाजलेले बलात्कार प्रकरणे आहेत. परंतु जगात हजारो-लाखो मानसिक व शारिरीक बलात्कार हे विवाहीत अविवाहित नव्हे जन्मलेल्या बालिकेपासून ते प्रौढ वयापर्यंत सतत चालू असतात आणि ह्या क्षणोक्षणी बलात्कार सहन करत असतात.[४]

**उपाययोजना :**

१) कायद्याची कठोर अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

२) महिलांबाबतीतीले गुन्ह्याचे निकाल फास्ट कोर्टात चालवून लगेच त्यांचे निष्कर्ष काढुन कठोर कारवाई करावी.

३) आई-वडीलांनी मुलांना स्त्रि आदर मनात इतका बिंबवावा की स्वत: अत्याचार करणे तर दूरच पण दुसऱ्या कुणालाही अत्याचार करु देणार नाही.

४) कुटुंबातील वडीलांनी आपल्या पत्नी / आई-बहिण व मुलीबरोबर मान सन्मापुर्वक वर्तन करावे. त्यामुळे घरातील मुले देखील ते बघून शिकतील.

५) साहित्य, पथनाट्ये, परिसंवाद, नाटके, चित्रपट, कविता, सोशलमिडिया यांच्या माध्यूमून स्त्रीयांचा आदर करणारे प्रबोधन करावे.[५]

स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळ्या अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजपर्यंत खाली दिले गेलेले कायदे अस्तित्त्वात आहेत.

**(कौटुंबिक हिंसाचार कायदा - २००५)**

१. भारतीय दंड विधान कायदा १९८६.
२. हुंडा प्रतिबंध कायदा १९६१.
३. सतीप्रथा विरोध कायदा १८२९.
४. स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन विरोधी कायदा १९८६.
५. घटस्फोट कायदा १८६९.
६. कुटुंब न्यायालय कायदा १९८४.
७. मुस्लिम महिलांसाठी कायदा १९८६.
८. गर्भलिंग परिक्षण व गर्भपात विषयक कायदा १९९४.

**भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार भेदभावापासून मुक्ती.**

- कलम १५ अन्वये स्त्री पुरुष समानता.
- कलम २१ अन्वये जीवित व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क महिलांनाही दिला आहे. तरीही महिला कौटुंबिक हिंसाचारास बळी पडतात. त्यांची प्रतिष्ठा सांभाळली जात नाही.
- छेडछाड केल्याबद्दल भारतीय दंड संहिता कलम ५०९.
- बालविवाह प्रतिबंधक अधिनियम (शारदा ॲक्ट) १९८७.
- विशेष विवाह अधिनियम १९५४.

**समारोप :**

महिलांवर होणारे सर्व अन्याय-अत्याचार हे मोठे गुन्हेगारी स्वरुपाचे मनोरुग्ण ओळखून त्यासाठी समाजातील सर्व घटकांनी मिळून कार्य करणे आवश्यक आहे. तसेच घरातील व्यक्ती विसरतात की, मुलं हे अनुकरणशील, अनुकरणप्रीय असतात आणि जे बघतात तेच ते शिकतात म्हणून पुढच्या पिढीला आदर्शात्मक वागणूक नकळतपणे त्यांच्याव बिंबवल्या जाते आणि या वागणूकीतूनच घरातील स्त्रील स्वतंत्र जगण्याचा मानसन्मानाने राहण्याचा व संरक्षणाचा अधिकार प्राप्त होईल. त्याकरीता वरील सर्व घटनांचा अभ्यास केला असता असे लक्षात की, महिला ह्या अन्यायकारक घटनांना सातत्याने बळी पडलेली आपणांस दिसून येते. अन्यायग्रस्त महिला / मुलगी सन्मानाने जगण्यासाठी सर्व मानव जातीने एक होवून सन्मापूर्वक वागणुक दिली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. महाराष्ट्र राज्य महिला आयोगा मुंबई.
२. भारतीय समाज - डॉ. भा. कि. खडसे, १, २.
३. स्त्री-भ्रुण हत्या- अरविंद जगताप, १, ३.
४. दैनिक, साप्ताहिके, मासिके व टेलीव्हीजन, १,४.
५. सत्यशोधक एल्गार - किशोर जाधव, ५.